उमेदवारी नाकारल्याने खासदार गावित नाराज

अनिलराज रोकडे/ वसई

राज्यातील सत्तातरानंतर शिवसेनेच्या शिंदे गटासोबत गेलेले पालघरचे विद्यमान खासदार राजेंद्र गावित यांना उमेदवारी नाकारल्यामुळे ते प्रचंड नाराज झाले असून, राज्यातील आणि केंद्रातील पक्षश्रेष्ठींनी उमेदवारीबद्दल दिलेला शब्द पाळला नाही, अशी भावना त्यांनी शुक्रवारी व्यक्त केली. मी आणि माझे कार्यकर्ते यांच्यासाठी हा अनपेक्षित निर्णय असून, त्यामुळे सर्वत्र नाराजी पसरली आहे. असे असले तरी महायुतीचा धर्म म्हणून आम्ही सर्व भाजप उमेदवार हेमंत सावरा यांच्या विजयासाठी सर्व ते प्रयत्न करणार असल्याची भूमिका खासदार गावित यांनी स्पष्ट केली आहे. मतदारसंघातील भाजपकडून करण्यात आलेल्या निवडणूक पूर्व सर्वेक्षणात खा. गावित यांच्या विजयाला धोका असल्याचे संकेत मिळाल्याने तिकीट कापण्यात आल्याचे बोलले जात आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून महायुतीमध्ये पालघरची जागा शिवसेना (शिंदे गट) किंवा भाजप अशी कुणाकडेही गेली, तरी उमेदवार म्हणून विद्यमान खासदार गावित यांना तिकीट मिळेल, असा सर्वत्र कयास बांधला जात होता. मात्र दोन आठवड्यांपासून पालघर जिल्हा भाजपमधून खासदार गावित यांच्या विषयीच्या नाराजीचे सूर तीव्र झाले होते. त्यांच्या विषयीची नाराजी वसई-विरार भाजपमधूनही व्यक्त झाली होती. परंतु ती शमविण्यात गावित यांना यश आले होते. जागा भाजपकडे गेल्यास कमळ या चिन्हावर निवडणूक लढविण्याची अनुकूलताही यापूर्वीच त्यांनी बोलून दाखवली होती.

चव्हाण यांनी खासदार गावित यांची भेट घेऊन, त्यांची विचारपूस केली. चव्हाण आणि मुख्यमंत्री शिंदे यांनी गावित यांना येत्या विधानसभा निवडणुकीत त्यांचे योग्य ते पुनर्वसन करण्याचे आश्वासन दिले आहे.

उमेदवारी नाकारल्याबद्दल तीव्र नाराज असलेले गावित पक्षश्रेष्ठींनी शब्द न पाळल्याबद्दलची नापसंती तसेच विद्यमान खासदाराला उमेदवारी नाकारणे कसे चुकीचे आहे, याबाबत प्रसारमाध्यमांकडे आज दुपारपर्यंत स्पष्ट बोलत होते. परंतु सायंकाळनंतर त्यांचा सूर सौम्य होत जाऊन, महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी आम्ही सर्व ते प्रयत्न करू, असे प्रतिपादन करण्यापर्यंत बदललेला होता.

मूळचे नंदुरबार येथील असलेले गावित व्यवसायानिमित्त मीरारोड येथे आले. आपल्या कुंडलीत राजयोग असल्याप्रमाणे, गावित हे काँग्रेस पक्षातून राजकीय प्रवास सुरू करताना, २००९ साली पालघरचे आमदार झाले. काँग्रेस आघाडीच्या सत्ता काळात राज्यमंत्रीपदाची त्यांना संधीही त्यांना मिळाली. तीन निवडणुकात त्यांना पराभव ही पचवावा लागला. नंतर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. पालघरच्या २०१८ च्या लोकसभा पोटनिवडणुकीत त्यांचा विजय होऊन, ते खासदार झाले. त्यानंतर २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत युतीचे उमेदवार म्हणून शिवसेनेच्या तिकिटावर दुसऱ्यांदा ते खासदार झाले. मात्र यावेळी खासदारकीची हॅटट्रिक साधण्याची संधी त्यांना प्राप्त झाली नाही.

ज्येष्ठ नागरिकाला ३७ लाखांचा गंडा

नवी मुंबई : अपहरण, अवयव तस्करी, अवैध सावकारी गुन्हे नोंदवल्यानंतर अटकेची भीती दाखवत एका ज्येष्ठ नागरिकाला ३७ लाख २९ हजार ८४० रुपयांचा गंडा घातल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. याबाबत सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

अलोक शुक्ला हे ७५ वर्षीय व्यक्ती असून नेरूळ येथे राहतात. १३ मार्चला राजवीर सिंग नावाच्या व्यक्तीचा फोन आला. त्याने स्वतः सीआयडी अधिकारी असल्याचे सांगत शुक्ला यांच्याविरोधात अपहरण, अवयव तस्करी, अवैध सावकारी अशा प्रकारचे गंभीर गुन्हे नोंदविण्यात आल्याचे सांगितले. फोनवरील अशा माहितीने शुक्ला हादरले, त्यात त्यांच्या व्हॉट्सॲपवर गुन्हे अन्वेषण सेल सीआयडी नवी दिल्ली या कार्यालयाच्या लेटर हेडवर समन्स पाठवण्यात आले. हे समन्स आल्यानंतर सिंगने पुन्हा अलोक शुक्ला यांना फोन करून याप्रकरणी अटक टाळण्यासाठी पैशांची मागणी केली. याबाबत सिंगने विविध खात्यात ३७ लाख २९ हजार ८४० रुपयांची रक्कम जमा करून घेतली.

जाहीर सूचना

तमाम जनतेस सूचना याद्वारे देण्यात येते की, माझ्या अशील म्हणजेच (१) श्रीम. सरस्वती कनकसिंह ठक्कर, (२) सौ. दिप्ती निलेश हरिया (लग्नापूर्वी: दिप्ती कनकसिंह ठक्कर), (३) श्री. विपुल कनकसिंह ठक्कर आणि (४) श्री. जिग्नेश कनकसिंह ठक्कर हे डॉ. आर. पी. रोड, एलआयसी कॉलनी, मुलुंड (पश्चिम), मुंबई - ४०० ०८० येथे स्थित कांचन व्हिला (मुलुंड) को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. (दिनांक २०/१०/१९७६ रोजीचा नोंदणी क्र. बीओएम / एचएसजी / ४९५३ सन १९७६) (यानंतर सदर सोसायटी अशी उल्लेखित) च्या कांचन अशा ज्ञात इमारतीच्या १ल्या मजल्यावर स्थित फ्लॅट क्र. १६ धारक निवासी परिसर (यानंतर सदर परिसर असे उल्लेखित) एकत्रित सह शेअर प्रमाणपत्र क्र. १६ मध्ये विधीसंपादित विभिन्न क्र. ७६ ते ८० (दोन्ही एकत्रित) धारक सदर सोसायटीचे प्रत्येकी रु. ५०/- च्या पाच पूर्ण भरणा शेअर्स (यानंतर सदर शेअर्स असे उल्लेखित) च्या संदर्भातील हक्कदार आहेत. सदर परिसरांच्या संदर्भातील दस्तावेजांची शृंखला आहे (१) पहिला करार हा मेसर्स देवजी शामजी पटेल ॲण्ड कं. आणि श्री. किशोर लक्ष्मीदास ठक्कर यांच्यादरम्यान दिनांक १ जानेवारी, १९७५ रोजी निष्पादित करण्यात आला होता आणि (२) दुसरा करार हा श्री. किशोर लक्ष्मीदास ठक्कर आणि श्री. कनकसिंह माधवजी ठक्कर यांच्यादरम्यान दिनांक १२ जून, १९७५ रोजी निष्पादित केलेला होता. सदर श्री. कनकसिंह माधवजी ठक्कर यांचे १ फेब्रुवारी, २०१६ रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्चात हिंदू सक्सेशन ॲक्ट, १९५६ जो त्यांच्या मृत्युच्या वेळी संचालित होता त्याच्या तरतुदींनुसार त्यांचे एकमेव वारसदार आणि पुढील वारस म्हणून माझे अशील आहेत. सदर स्वर्गीय श्री. कनकसिंह माधवजी ठक्कर यांच्या आई श्रीम. रतनबेन माधवजी ठक्कर यांचे त्यांच्या आधीच १ मार्च, १९९२ रोजीस निधन झाले होते. सदर स्वर्गीय श्री. कनकसिंह माधवजी ठक्कर यांना त्यांच्या जीवनकाळात त्यांचे नामनिर्देशक म्हणून त्यांची पत्नी म्हणजेच श्रीम. सरस्वती कनकसिंह ठक्कर यांना नामनिर्देशित केले होते आणि कायद्याच्या प्रक्रियेनुसार सदर सोसायटीने सदर सोसायटीचे सदर परिसर आणि सदर शेअर्सच्या संदर्भातील सदस्यत्व हक्क त्यांचे नामनिर्देशित म्हणजेच श्रीम. सरस्वती कनकसिंह ठक्कर यांच्या नावे हस्तांतरित केले होते.

जर कोणत्याही व्यक्तींना सदर परिसरांच्या संदर्भातील स्वर्गीय श्री. कनकसिंह माधवजी ठक्कर यांच्याद्वारे कोणतेही शेअर्स किंवा हितसंबंध असल्यास किंवा सदर परिसर किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या वर किंवा विरोधात किंवा संदर्भात कोणताही हक्क, नामाधिकार, हितसंबंध, दावे किंवा मागण्या जसे की, विक्री, अदलाबदल, भाड्याने देणे, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, लिव्ह ॲण्ड लायसन्स, मार्गाचा हक्क, सुविधाधिकार, कुळवहिवाट, भोगवटा, अभिहस्तांकन, गहाण, वारसाहक्क, अंत्यदान, नामाधिकारांतील पूर्वज, उत्तराधिकारी, बक्षीस, धारणाधिकार, प्रभार, निर्वाह, विश्वस्त, मुळ नामाधिकार विलेखाचा ताबा किंवा कोणतेही भार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा किंवा कोणत्याही अन्य अधिकारी यांचा आदेश किंवा हुकुम, कंत्राट, करार, विकास हक्क किंवा अन्य काही कसल्याही स्वरूपाचे दावे असल्यास याद्वारे मला सदर लिखित कागदोपत्री पूराव्यासह माझ्या खालील नमुद पत्त्यावर या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, असे समजले जाईल की, तेथे सदर परिसरांच्या संदर्भामध्ये तसे दावे किंवा मागणी ह्यात नाहीत आणि तशा व्यक्तींचे दावे किंवा मागणी जर असल्यास ते सर्व इच्छा आणि हेतुनुसार त्यागित आणि परित्यागित समजले जातील आणि सदर परिसरांचे नामाधिकार स्पष्ट, पणनयोग्य आणि सर्व भारांपासून मुक्त समजले जातील.

सही/-
विकास ठक्कर
वकील उच्च न्यायालय
४०१/४०२, साईनाथ हाऊस, बी. पी. एस. क्रॉस रोड क्र. १,
शेरॉन स्कूल जवळ, मुलुंड (पश्चिम), मुंबई - ४०० ०८०.

कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरिता) नियम ८-(१)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार यांनी **आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड** (याआधी इंडिया इन्फोलाईन हाऊसिंग फायनान्स लि. नावे ज्ञात) (आयआयएफएल-एचएफएल) चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून वेधील खालील नमूद कर्जदार/सह-कर्जदार यांना सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत चुकती करण्यासाठी बोलाविण्याकरिता कंपनीच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे मागणी सूचना निर्गमित केलेली आहे. कर्जदार रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून सदर अधिनियमाचे कलम १३(४) सहवाचता सदर रूलसच्या नियम ८ अन्वये यात याखाली वर्णन केलेल्या मिळकतीचा **कब्जा** घेतलेला आहे. विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदर मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीवरील कोणताही देवघेवीचा व्यवहार हा **आयआयएफएल- एचएफएल** च्या खालील नमूद रकमेसह त्यावरील व्याजाच्या प्रभाराअधीन राहील. ॲक्टच्या कलम १३ च्या पोटकलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येते. जर विक्री किंवा हस्तांतरणासाठी निर्धारित तारखेपूर्वी कोणत्याही वेळी झालेल्या सर्व खर्च, परिव्यय आणि आकार यासह **आयआयएफएल एचएफएल** ची थकबाकी कर्जदारांनी चुकती केली तर **आयआयएफएल एचएफएल** कडून तारण मत्तांची विक्री किंवा हस्तांतरण केले जाणार नाही आणि तारण मत्तांच्या विक्री किंवा हस्तांतरणासाठी **आयआयएफएल एचएफएल** कडून पुढील पावले उचलली जाणार नाहीत.

कर्जदार/सह-कर्जदारांचे नाव	तारण मत्तेचे वर्णन (स्थावर मिळकत)	एकूण देय थकबाकी (रु.)	मागणी सूचनेची तारीख	कब्जाची तारीख
श्री. दशरथ शंकर घोरपडे, सौ. कौसल्या दशरथ घोरपडे, स्वराली टेलरिंग फार्म, **(प्रॉस्पेक्ट क्र. आयएल१०४४८५२१)**	हिस्सा क्र.४३ येथे स्थित पोगरवाडी ग्रामपंचायत, पोस्ट करंदी आरे डेअर रोड, सातारासिटी, जानाई माता मंदीर जवळ, सातारा, महाराष्ट्र, इंडिया-४१५००२ चे ते सर्व भाग आणि विभाग. क्षेत्र मोजमापित (चौ.फू.मध्ये): मिळकत टाईप: जमिन क्षेत्र, बिल्ट अप क्षेत्र, चटई क्षेत्र, मिळकत क्षेत्र: ११५२.००, ९००.००, ७२०.००	रु. ६,६७,७११/- (रुपये सहा लाख सदुसष्ट हजार सातशे अकरा मात्र)	१३-जानेवारी-२०२४	३०-एप्रिल-२०२४
श्री. राजू मोहन चव्हाण, सौ. रोहिणी राजू चव्हाण, कंटल बिझनेस, **(प्रॉस्पेक्ट क्र. आयएल१०३२५९१७)**	मिळकत धारक चे ते सर्व भाग आणि विभाग: हिस्सा क्र.बी-६०/२, येथे स्थित रहालपट्टी तांडा, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००५, इंडिया. क्षेत्र मोजमापित (चौ.फू.मध्ये): मिळकत टाईप: जमिन क्षेत्र, बिल्ट अप क्षेत्र, चटई क्षेत्र मिळकत क्षेत्र: ६००.००, २९८.००, २३८.००	रु. ५,७७,७७५/- (रुपये सात लाख सत्त्याहत्तर हजार सातशे आणि पंच्याहत्तर मात्र)	२३-नोव्हेंबर-२०२३	३०-एप्रिल-२०२४
श्री. प्रकाश लक्ष्मण भिल, कु. वैशाली, कंटेल्स बिझनेस, **(प्रॉस्पेक्ट क्र. आयएल१०३५५५३१)**	हिस्सा क्र.४७३ येथे पोस्ट अंबडे, आदि वासी समाज मंदीर, ता आणि जिल्हा धुळे, महाराष्ट्र, इंडिया-४२४३०१ चे ते सर्व भाग आणि विभाग. क्षेत्र मोजमापित (चौ.फू. मध्ये): मिळकत टाईप: जमिन क्षेत्र, बिल्ट अप क्षेत्र, चटई क्षेत्र, मिळकत क्षेत्र: ९००.००, ८९६.००, ७२०.००	रु. ५,४१,३२१/- (रुपये पाच लाख बेचाळीस हजार तीनशे एकवीस मात्र)	१३-जानेवारी-२०२४	३०-एप्रिल-२०२४
श्री. सुनील शिवाजी जगताप, सौ. पद्मवी सुनील जगताप, श्री. शिवाजी सखाराम जगताप, सौ. वैशाली शिवाजी जगताप, गुरूप्रसाद मोबाईल, **(प्रॉस्पेक्ट क्र. आयएल१०३५७०२७)**	मिळकत धारक चे ते सर्व भाग आणि विभाग: हिस्सा क्र.२२३ खेड येथे स्थित, सातारा, विठ्ठल मंदीर जवळ, सातारा, महाराष्ट्र, इंडिया-४१५००३. क्षेत्र मोजमापित (चौ.फू.मध्ये): मिळकत टाईप: जमिन क्षेत्र, बिल्ट अप क्षेत्र, चटई क्षेत्र, मिळकत क्षेत्र: ९९८.००, ७००.००, ५६०.००	रु. ८,०९,९९७/- (रुपये आठ लाख नऊ हजार नऊशे सत्त्याण्णव मात्र)	२३-नोव्हेंबर-२०२३	३०-एप्रिल-२०२४
श्रीम. महादेव हनुमंत सोनवणे, कु. राणी महादेव सोनवणे, **(प्रॉस्पेक्ट क्र. आयएल१०२९५६०५)**	हिस्सा क्र.११, सपकाळवाडी येथे स्थित, इंदापूर, पुणे, महाराष्ट्र-४१३१०४ चे ते सर्व भाग आणि विभाग. क्षेत्र मोजमापित (चौ.फू.मध्ये): मिळकत टाईप: जमिन क्षेत्र, बिल्ट अप क्षेत्र, चटई क्षेत्र, मिळकत क्षेत्र: ५५०.००, २६२.००, २४०.००	रु. २,९७,२७७/- (रुपये दोन लाख सत्त्याण्णव हजार दोनशे सत्त्याहत्तर मात्र)	१३-जानेवारी-२०२४	३०-एप्रिल-२०२४

पुढील तपशिलासाठी कृपया **शाखा कार्यालय:-** आयआयएफएल हाऊस, सन इनफोटेक पार्क रोड क्र. १६व्ही, प्लॉट क्र.बी-२३, ठाणे इंडस्ट्रियल एरिया, वागळे इस्टेट, ठाणे-४००६०४ किंवा **कॉर्पोरेट कार्यालय:** आयआयएफएल टॉवर, प्लॉट क्र. ९८, फेझ- IV, उद्योग विहार, गुरगाव, हरियाणा यांना संपर्क करावा.

ठिकाण : ठाणे, दिनांक : ०४-०५-२०२४ — सही/- प्राधिकृत अधिकारी, आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड करिता

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण नं-३

वित्त मंत्रालय, भारत सरकार, सेक्टर ३०ए, रघुलीला मॉलच्या पुढे, वाशी रेल्वे स्टेशन जवळ, वाशी, नवी मुंबई-४००७०३.

RECOVERY PROCEEDING NO 174 OF 2018

बँक ऑफ बडोदा ... प्रमाणपत्र धारक
विरुद्ध
संदिप निवृत्ती अपसुंदे व इतर ... प्रमाणपत्र कर्जदार

विक्री घोषणेची पुर्तता करण्यासाठी सूचना

१. श्री. संदिप निवृत्ती अपसुंदे
२. सौ. गंगुबाई सदाशिव अपसुंदे
३. श्री. केशव संपत अपसुंदे
४. श्री. पंढरीनाथ संपत अपसुंदे

सर्वांचा पत्ता मु.पोस्ट जांबुटके, ता. दिंडोरी, जि.नाशिक-४२२२०६.

ज्याअर्थी माननीय पीठासिन अधिकारी यांनी **O.A. No. 312 of 2017** मध्ये वसुली प्रमाणपत्र जारी केले आहे. अर्जदार बँक/वित्तीय संस्थांना **रू. १८,६८,३६४.००/ (अक्षरी रू. अठरा लाख अडुसष्ट हजार, तीनशे चौसष्ट फक्त)** खर्च आणि व्याजासह, आणि

. तर तुम्ही CDs रक्कम भरली नाही आणि खाली स्वाक्षरीने खाली नमुद केलेली मालमत्ता संलग्न केलेली आहे आणि तिची विक्री करण्याचे आदेश दिले आहेत.

म्हणुन, आपणास याद्वारे सुचित केले जाते की विक्रीची घोषणा काढण्यासाठी आणि त्यातील अटींची पुर्तता करण्यासाठी ०५/०६/२०२४ निश्चित करण्यात आली आहे. तुम्हाला याद्वारे घोषणेच्या अटींच्या सेटलमेंटमध्ये सहभागी होण्यासाठी आणि नमूद केलेल्या मालमत्तेशी संलग्न असलेले कोणतेही बोजा, शुल्क दावे किंवा दायित्वे किंवा त्यांच्या कोणत्याही भागाची माहिती खाली स्वाक्षरीदाराच्या निदर्शनास आणण्यासाठी आमंत्रित केले आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

१. गट नं. २३१/पी क्षेत्र एकर ४.६५६ गांव जांबुटके, ता. दिंडोरी, जि.नाशिक येथील शेतजमीन लॉट नं.१ बेअरींग मालमत्तेचा सर्व भाग व पार्सल.
२. गट नं. २४५/१पी क्षेत्र एकर ३.३१ गांव जांबुटके, ता. दिंडोरी, जि.नाशिक येथील शेतजमीन लॉट नं.२ बेअरींग मालमत्तेचा सर्व भाग व पार्सल.

माझे सही व ऋणवसुली कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे दि. ३/०५/२०२४

शिक्का — **सही/- (दीपा सुब्रमण्यन)**
वसुली अधिकारी-I
डीआरटी ३

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २ मध्ये

३ रा मजला, टेलिफोन भवन, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई- ४००००५.
ओ. ए. क्र. ६३० सन २०१७

नि. क्र. १८
पंजाब नॅशनल बँक ...अर्जदार
विरुध्द
मे. किरण इन्सुलेटेड वायर इंडस्ट्रीज आणि अन्य ...प्रतिवादी

ज्याअर्थी सदर **ओ.ए. ६३० सन २०१७** हा रु. ४,८५,७०,१५५.९३/- च्या वसुलीकरिता प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विरोधात अर्जदार पंजाब नॅशनल बँकेने दाखल केला होता.

ज्याअर्थी, अर्जदार बँकेला प्रतिवादी क्र. ३ (ए) आणि ३(बी) म्हणुन नोंदीवर मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे कायदेशीर वारस अशी सदर ओ.ए. मध्ये सुधारणा करण्याची परवानी देण्यात आली आणि त्यानुसार सदर ओ.ए. मध्ये सुधारणा करण्यात आली.

ज्याअर्थी साधारण स्वरुपात सुधारित ओ.ए. ची बजावणी परिणामकारक झालेली नाही आणि ज्याअर्थी सदर न्यायाधिकरणाद्वारे पर्यायी बजावणीकरिता अर्जाला परवानगी देण्यात आली आहे.

त्यामुळे तुम्हाला सदर न्यायाधिकरणासमोर **१३/०५/२०२४ रोजी स. ११.०० वा.** तुमच्या खटल्याचा बचाव करण्यासाठी व्यक्तीश: किंवा वकिलांद्वारे हजर राहणे आवश्यक आहे, कसूर केल्यास खटल्यातील योग्य तो आदेश मंजुर करण्यात येईल.

माझ्या हस्ते आणि सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने सदर दिनांक **३० ऑक्टोबर, २०२३** रोजी दिले.

शिक्का — **प्रबंधक**
कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र.२
मुंबई

प्रतिवादींचे नाव आणि पत्ता
(१) मे. किरण इन्सुलेटेड वायर इंडस्ट्रीज
(प्रोप्रा. किरण के. मेरानी)
एच/४, कामा इंडस्ट्रियल इस्टेट,
वालभट रोड, गोरेगाव (पू),
मुंबई - ४०० ०६३.
(२) सौ. किरण मेरानी
(३) (ए) श्रीम. राखी मेरानी
(बी) सौ. किरण मेरानी
दोघीही राहणार:
फ्लॅट क्र. ११, ब्राइटलँड को-ऑप. हौ. सोसा. लि.,
प्लॉट क्र. ४४०, १४वा रोड, सीटीएस ८९, वांद्रे (प.),
मुंबई - ४०० ०५०.
(४) कु. राखी मेरानी
दोघीही राहणार:
फ्लॅट क्र. ११, ब्राइटलँड को-ऑप. हौ. सोसा. लि.,
प्लॉट क्र. ४४०, १४वा रोड, सीटीएस ८९, वांद्रे (प.),
मुंबई - ४०० ०५०.

पंजाब नॅशनल बँक punjab national bank

Together for the better

शाखा कार्यालय-५१, भगवान दास अपार्टमेंट,
रघवेंद्र स्वामी जन मंदिराजवळ, झवेर रोड,
मुलुंड पश्चिम, मुंबई ४०००८०

(सुधारित एसआय ४)

कर्जदारांना ६० दिवसांची नोटीस

दिनांक: ०३.०४.२०२४

श्री. संदिप काळे **सौ आशा संदिप काळे** दुकान क्र.१, मारुती आंगण, प्लॉट क्र. १४ सेक्टर क्र. ५, गाव कामोठे, नवी मुंबई ४१०२०६	**श्री. संदिप काळे** **सौ आशा संदिप काळे** फ्लॅट क्र. २०१, २रा मजला, सी विंग, इंद्र धाम सीएचएसएल, प्लॉट क्र. ६७ सेक्टर क्र. ६ए, गाव कामोठे, नवी मुंबई ४१०२०६

महोदय,
सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अन्वये सूचना
संदर्भ : खाते क्र. १२७७००एनटी००००००४१ आणि१२७७००९९००००००७८२, श्री संदिप काळे आणि सौ. आशा संदिप काळे यांना दिलेली पतसुविधा
तुम्ही, श्री संदिप काळे आणि सौ. आशा संदिप काळे यांना दिलेली पतसुविधा घेतलेल्या पतसुविधा खालीलप्रमाणे:

अ. क्र.	सुविधा	मर्यादा	व्याज दर	एनपीएच्या तारखेरोजीस उर्वरीत थकीत (म्हणजेच मुद्दल+ व्याज)	व्याज (२९.०२.२०२४ ते ३१.०३.२०२४ पासून)(सूचनेच्या तारखेपर्यंत)	सूचना जारीच्या म्हणजेच ०३.०४.२०२४ तारखेपसून एकूण थकीत
१.	टर्म लोन-पीएमएवाय योजनेन्वये गृह कर्ज (१२७७००एनटी०००००००४१)	रु. २३५००००	९.५०%	२३४८६२१.३८	१८४३६	२३,६७,०५७.३८ + पुढील व्याज
	ओव्हरड्राफ्ट (गृह) (१२७७००९९००००००७८२)	रु. ३३००००	११.००%	३३१२६०.५९	३१९६	३,३४,४५६.५९ + पुढील व्याज
			एकूण	रु. २६७९८८१.९७ + पुढील व्याज		२७,०१,५१३.९७

* **आरओआय-** सुविधा मंजूरीच्या वेळेस आणि आरबीआय मार्गदर्शन तत्वानुसार वेळो वेळी बदलाच्या अधीन, एनपीएच्याच्या आधी २८.०२.२०२४ पर्यंत खात्यामधील लावलेले व्याज आणि क्रेडीटचे नेटींग नंतर **२९.०२.२०२४** पासून व्याज दर.

हप्ते/व्याज/मुद्दल कर्ज यांच्या विनाप्रदानामुळे खाते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मार्गदर्शक तत्त्वानुसार **२२.०३.२०२४** रोजीस नॉन परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. आम्ही वरील सुविधेच्या अंतर्गत संपूर्ण थकबाकीसह एकत्रित **२६.०३.२०२४** दिनांकित पत्राद्वारे वरील सुविधा अन्वये व्याज आणि थकीत इतर प्रभाराची मागणी/परत मागवित आहोत.

बँकेला देय असलेली रक्कम आहे **०३.०४.२०२४ रोजीस रु. २७,०१,५१३.९७(सत्तावीस लाख एक हजार पाचशे तेरा आणि सत्त्याण्णव पैसे मात्र)** सह संपूर्ण प्रदानापर्यंत पुढील व्याज (ह्यानंतर ''तारण कर्ज'' असा उल्लेख)

वरील सदर सुविधेच्या अंतर्गत थकीत रकमेच्या तारणासाठी तुम्ही खालील मिळकत/मत्तेच्या संदर्भात इतर गोष्टींसह तारण हितसंबंध निर्माण केले आहेत.

सुविधा	तारण
गृहकर्ज	फ्लॅट क्र. २०१, २रा मजला, सी विंग, इंद्र धाम सीएचएसएल, प्लॉट क्र. ६७ सेक्टर क्र. ६ए, गाव कामोठे, नवी मुंबई ४१०२०६

आम्ही याद्वारे तुम्हाला तारखेपासून ६० दिवसांत (साठ दिवसांत) संपूर्ण प्रदानापर्यंत संविदात्मक दराने पुढील व्याज आणि आकार यासह **रु. २७,०१,५१३.९७(सत्तावीस लाख एक हजार पाचशे तेरा आणि सत्त्याण्णव पैसे मात्र)** च्या संपूर्ण रकमेचा भरणा करण्यासाठी बोलावित आहोत कसूर केल्यास कायद्याने बँकेला उपलब्ध असलेल्या अधिकारांचा वापर करण्यासह बँक **सिक्युरीटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या कलम १३(४) (यानंतर सदर ॲक्ट असा संदर्भ)** अन्वये पुरविण्यात आल्याप्रमाणे कोणताही वा सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी इच्छुक आहे.

तुमच्याद्वारे तारण कर्जाचे प्रदान न झाल्यास बँकेला अंमलबजावणी करण्यासाठी इच्छुक असलेल्या तारण मत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे: -

फ्लॅट क्र. २०१, २रा मजला, सी विंग, इंद्र धाम सीएचएसएल, प्लॉट क्र. ६७ सेक्टर क्र. ६ए, गाव कामोठे, नवी मुंबई ४१०२०६

तारण मत्तांचे विमोचन करण्याकरिता उपलब्ध असलेल्या वेळेच्या संबंधात ॲक्ट च्या कलम १३ च्या पोट-कलम (८) च्या तरतुदींकडे तुमचे लक्ष वेधण्यांत येत आहे.

कृपया नोंद घ्यावी की, सदर ॲक्टच्या कलम १३(१३) च्या संदर्भात, तुम्ही ह्या सूचनेच्या प्राप्तीनंतर बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय वरील उल्लेख तारण मत्ता विक्री, भाडेपट्टा वा इतर मार्गाने (कामकाजाचा सर्वसाधारण भाग वगळून) हस्तांतरण करू शकणार नाहीत.

तुमचे लक्ष सूचनेकडे वेधून घेण्यात येते की, सदर ॲक्ट अन्वये पुरविण्यात आल्याप्रमाणे सदर वैधानिक व्यादेश/मनाई यांचे कोणतेही उल्लंघन गुन्हा आहे. कोणत्याही कारणाकरिता, तारण मत्ता व्यवसायाच्या सर्वसाधारण ओघात विकण्यास वा भाडेपट्ट्याने दिल्यास, मुक्त झालेले विक्री उत्पन्न वा प्राप्ती बँकेत जमा करण्यात यावी/भरण्यात यावी. तुम्ही अशी वसुली/उत्पन्नाचा योग्य लेखा पुरवावा.

*इतर तारण मत्तांच्या अंमलबजावणीसाठी आमचे हक्क राखून ठेवत आहोत.

कृपया सदर सूचने अन्वये सदर मागणीचे अनुपालन करावे आणि सर्व अप्रिय गोष्टी टाळाव्यात, विनाअनुपालनाच्या बाबतीत, सर्व खर्च आणि परिणामांकरिता तुम्हाला दायित्व ठरवत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

सदर सूचना ही डीआरटी/न्यायालय यासमक्ष कायदेशीर कारवाई करण्यासाठी बँकेला बाधा न आणता निर्गमित केलेली आहे.

आपला विश्वासू,
पंजाब नॅशनल बँकसाठी
प्राधिकृत अधिकारी
नाव: मैतयी श्रीमाळी

जाहीर सूचना

माझे आशिल विले पार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७ येथील राम मंदिर रोड आणि प्रार्थना समाज रोडचे जंक्शन येथील गाव विले पार्ले (पूर्व) च्या अंतिम प्लॉट क्र. ९७ आणि ९६ येथे स्थित नव्याने बांधलेली इमारत ईडेन - II मधील फ्लॅट क्र. ४०३, मोजमापित ४७० चौ. फू. रेरा चटई क्षेत्र, खरेदी करण्यास वाटाघाटी केले आहे, जे याखाली लिखित परिशिष्टात अधिक तपशीलवारपणे विवर्णित (यानंतर **सदर फ्लॅट** म्हणून संदर्भित) आणि मे. संभवपार्श्व डेव्हलपर्स प्रा. लि. द्वारे विकसित केले जात आहे.

माझ्या अशिलाने सदर फ्लॅटच्या संदर्भात नामाधिकार तपास करण्यास मला सुचित केले आहे. कोणत्याही व्यक्तीस सदर फ्लॅट किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये विक्री, भेट, भाडेपट्टा, धारणाधिकार, प्रभार, विश्वस्त, देखभाल, सुविधाधिकार किंवा याशिवाय कसेहीच्या मार्गे कोणताही हक्क, नामाधिकार किंवा हितसंबंध असल्यास, किंवा असल्याचे दावा करित असल्यास, तसे लिखित स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय येथे बी-१०२, अथर्व पॅलेस, मानस पॅलेस को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, प्रार्थना समाज रोड आणि पार्क रोडचे जंक्शन, विले पार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७ येथे सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत सदर कळविणे आवश्यक आहेत, कसूर केल्यास, तसे हक्क, नामाधिकार किंवा हितसंबंध काही असल्यास ते त्यागित मानले जातील.

वरील उल्लेखित मिळकतीचे परिशिष्ट

विले पार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७ येथील राम मंदिर रोड आणि प्रार्थना समाज रोड चे जंक्शन येथील गाव विले पार्ले (पूर्व) च्या टीपीएस - I च्या अंतिम प्लॉट क्र. ९७ आणि ९६ आणि सी. टी. एस. क्र. ९९१, ९९१/१ ते ३ आणि सी.टी.एस. क्र. ९९२, ९९२/१ ते ५ संबंधित, येथे स्थित नव्याने बांधलेली इमारत ईडेन- II मधील फ्लॅट क्र. ४०३, मोज